# राज्याबाहेरील प्रशिक्षणासह अभ्यास दौरा – अहवाल

## स्थळ

## ICAR – Indian Institute Of Soybean Research, Indore (M.P.)




## कालावधी : दि.१६.०३.२०२५ ते २२.०३.२०२५

## आयोजक

## प्रमुख, जिल्हा अंमबजावणी कक्ष

# मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट ) सांगली

## राज्याबाहेरील प्रशिक्षणासह अभ्यास दौरा –अहवाल

**राज्याबाहेरील प्रशिक्षणासह अभ्यास दौरा दि.१६.०३.२०२५ ते २२.०३.२०२५ या कालावधीत ICAR- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सोयाबीन रिसर्च, इंदोर या ठिकाणी आयोजित करण्यात आला. सदर प्रशिक्षणामध्ये एकूण सात शेतकरी उत्पादक कंपनी चे ३० सभासद उपस्थित उपस्थित होते. प्रशिक्षणाचा अभ्यास दौरा तालुका कृषी अधिकारी कार्यालय वाळवा- इस्लामपूर या ठिकाणापासून सुरू झाला. प्रशिक्षण संस्थेमध्ये १७.०३.२०२५ रोजी सकाळी दहा वाजता पोहोचला.**



दरम्यानच्या कालावधीत विविध शेतकरी उत्पादक कंपन्या व प्रगतशील शेतकरी यांच्या शेतावर भेट दिल्या. इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ सोयाबीन रिसर्च, इंदोर येथे सर्व उपस्थित शेतकऱ्यांनी प्रशिक्षणासाठी नोंदणी केली. मा. संचालक डॉ. गुप्ता, यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. दुपारे, डॉ.




अभिषेक भारती, डॉ.एम पी शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशिक्षणाचे उद्घाटन करण्यात आले.

प्रशिक्षणाच्या पहिल्या सत्रात अभिषेक भारती यांनी सोयाबीन धान्यापासून दूध तयार करणे दुधापासून पनीर, दही, मठ्ठा ओकारा (चोथा) पासून विविध पदार्थ उदा सोयाशेव, भजी, चकली, सोयानट, उपमा,हलवा,सोया चंक, सोया केक, इत्यादी उपपदार्थ तयार करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे सोयाबीन उद्योगासाठी लागणारी यंत्र सामुग्री, त्यांची उपलब्धता व सोयाबीन आधारित प्रकल्पाचा अंदाजित खर्च याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर त्यांनी भविष्यात असणाऱ्या सोयाबीन आधारित उद्योगाची संधी याबाबतही सविस्तर मार्गदर्शन केले. सोयाबीन मध्ये असणाऱ्या प्रोटीन या घटकाबाबत ही सविस्तर मार्गदर्शन केले. त्यामुळे प्रोटीन चे आहारातील महत्त्व आणि त्यापासून शरीराच्या विविध व्याधीवर उपयुक्त सोयाबीनचे सखोल मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रामध्ये श्री दीपक,  श्री अभिषेक भारती, योगेश सहानी व जयश्री वासुदेवन यांनी सोयाबीन पासून दूध तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. यामध्ये सोयाबीन चार तास




भिजवणे,त्यानंतर 1:8  या प्रमाणात सोयाबीन बियाणे व पाणी यांचे मिश्रण करून मिक्सरच्या माध्यमातून सोयाबीन पासून दूध तयार करण्याची प्रक्रिया समजावून सांगितली. त्याचप्रमाणे सध्या अस्तित्वात असलेल्या अद्यावत यंत्रसामुग्रीची सविस्तर माहिती दिली. सोयाबीन दूध व ओकारा अलग करण्या करण्याची प्रक्रिया समजावून सांगितली. उपस्थित प्रशिक्षणार्थींना सदर प्रक्रिया हाताळणीची संधी दिली. त्यानंतर सोयाबीन दूध उकळून दूध फाडणे, त्यासाठी आवश्यक खाद्य रसायने घालून त्यापासून पनीर करण्याची प्रक्रिया प्रात्यक्षिकाद्वारे दाखवली.  यामध्ये सोया पनीर व सोया व्हे अलग करू प्रेस मशीन चा वापर करून सोयाबीन पनीर-टोफू तयार करणे व पॅकिंग करणे याची माहिती प्रत्यक्षिकाद्वारे दिली. तयार झालेल्या टोफू चा आस्वाद उपस्थित प्रशिक्षणार्थीने घेतला. सोयाबी व्हे पासून तयार करण्यात येणाऱ्या सॉफ्ट ड्रिंक्स ची सविस्तर माहिती त्यांनी दिली व प्रशिक्षणाचा पहिला दिवस पूर्ण झाला.

प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात डॉ दुपारे यांनी सोयाबीन लागवड तंत्रज्ञान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यामध्ये संस्थेमार्फत विकसित केलेल्या विविध तंत्रज्ञानाची त्यांनी माहिती दिली. यामध्ये सोयाबीनच्या विविध जाती, सोयाबीन बीज प्रक्रिया, सोयाबीन पेरणी साठी विकसित केलेले पेरणी यंत्र, पीक संरक्षण, पाणी व्यवस्थापन, काढणी मळणी व  सोयाबीन साठवणूक याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

डॉ. विनीत कुमार, जैव रसायन शास्त्रज्ञ यांनी सोयाबीन मध्ये असणाऱ्या ट्रिप्सीन या घटका विरहित विकसित  केलेल्या विविध वाणांचा आढावा घेतला. सोयाबीनमध्ये असणाऱ्या ट्रिप्सीन या घटकामुळे सोयाबीन थेट खाऊ शकले जात नाही. यासाठी संस्थेने विकसित केलेल्या येणार NCR 142 व 147 या वाणांची सविस्तर माहिती दिली. हे वाण थेट खाण्यासाठी उपयुक्त असल्याबाबत विवेचन केले. या वनामध्ये असणाऱ्या विविध घटकांचाही त्यांनी आढावा घेतला.

दुपारच्या सत्रामध्ये श्री दीपक श्री अभिषेक भारती योगेश सहानी व जयश्री वासुदेवन यांनी सोया नमकीन तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. यामध्ये सोयानट सोयाशेव, चकली, पनीर भाजी, सोयाभजी तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले व उपस्थित प्रशिक्षणार्थींना त्यांचा आस्वाद देऊन प्रशिक्षणार्थी मध्ये सोयाबीन उपपदार्थ तयार करणे व त्याचा व्यवहारी उपयोग दाखवून प्रशिक्षणार्थींच्या मध्ये आत्मविश्वास निर्माण केला. अशा तऱ्हेने प्रशिक्षणाचा दुसरा दिवस पूर्ण झाला.



प्रशिक्षणाच्या तिसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात डॉ मृणाल कुचलान यांनी सोयाबीन बीजोत्पादन पद्धती विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यामध्ये सोयाबीनचे पैदासकर बियाणे तयार करण्यापासून ते शेतकऱ्यांना बियाणे म्हणून उपलब्ध होत असलेल्या बियाण्याच्या निर्मिती बद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी सोयाबीन बीज प्रक्रिया केंद्रास भेटीचे आयोजन करून प्रशिक्षणार्थींना बियाणे प्रक्रिया सयंत्राची सविस्तर माहिती दिली. त्याचबरोबर संस्थेमार्फत विकसित केलेल्या बीज प्रक्रिया सयंत्राची ही माहिती दिली

डॉ. राकेश शर्मा यांनी सोयाबीन लागवड तंत्रज्ञानासाठी विकसित केलेल्या विविध तंत्रज्ञानाची माहिती दिली. यामध्ये कृषी विद्या विषयक लागवड तंत्रज्ञानाची माहिती दिली. यामध्ये प्रामुख्याने सोयाबीन पेरणी अंतर, रासायनिक खत व्यवस्थापन, फवारणी तंत्रज्ञान, कीड व रोग व्यवस्थापन, काढणी मळणी तंत्रज्ञान, साठवणूक इ. विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर 0 मशागत आधारित सोयाबीन- गहू- बटाटा पिक पद्धती विषयी सविस्तर मार्गदर्शन करून प्रक्षेत्र भेटीचे आयोजन केले.



दुपारच्या सत्रामध्ये श्री दीपक, श्री अभिषेक भारती, योगेश सहानी व जयश्री वासुदेवन यांनी स्पीड प्रेस मशीन च्या माध्यमातून सोयाबीन पासून थेट तेल काढण्या चे तंत्रज्ञान समजावून सांगितले व त्यासाठी उपलब्ध असलेल्या मशनरी ची सविस्तर माहिती दिली. त्याचबरोबर सोया केक ची मागणी व पुरवठा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सोयाबीन पिकाच्या भविष्यातील मागणी संदर्भात विवेचन केले. त्याचबरोबर सोयाबीन पासून सोया उपमा व सोया हलवा तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले व उपस्थित प्रशिक्षणार्थींना त्यांचा आस्वाद ही दिला. अशा प्रकारे सोयाबीनच्या विविध उपपदार्थाबद्दल प्रात्यक्षिका द्वारे माहिती दिल्यामुळे उपस्थित प्रसजीक्षणार्थींच्या माफ़ह्ये आत्मविश्वास निर्माण झाला. प्रशिक्षणाचा समारोप मा संचालक गुप्ता, डॉ दुपारे, डॉ. एम पी शर्मा यांच्या उपस्थितीत झाला

(अमित कवठेकर)
नोडल अधिकारी तथा
उपसंचालक कृषी व्यवसाय
जिल्हा अंमलबजावणी कक्ष
स्मार्ट, सांगली